# ग्रामपंचायत कार्यालय पारगाव सुद्रिक

## ता.श्रीगोंदा जि.अहिल्यानगर

### ग्रामपंचायत कर्मचारी पद भरती २०२५

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९मधील कलम ६१ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अन्वये पारगाव सुद्रिक येथील सर्व ग्रामस्थांना सुचित करण्यात येते की, शासन निर्णयानुसार आकृती बंधाप्रमाणे आपल्या ग्रामपंचायत कार्यालयासाठी चार कर्मचारी पद मंजूर असून, कर्मचारी एक सेवा निवृत्त झाल्याने हे नव्याने भरणे आहे. तेव्हा दि.०८/१०/२०२४ रोजी ठराव नं.७ ने झालेल्या प्रशासकीय आदेशान्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ६१ नुसार सदरील पदाच्या निवडीसाठी इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी खालील अटी शर्तीच्या निकषात बसणाऱ्या इच्छुकांनी आपले अर्ज विहीत कालावधीत ग्रामपंचायत पारगाव सुद्रिक कार्यालयात समक्ष आणून द्यावेत. यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अर्ज करण्याची पद्धत :**

| | |
|---|---|
| १ | ऑफलाईन पद्धतीने लेखी स्वरुपात अर्ज स्विकारण्यात येतील. |
| २ | पात्र उमेदवारांनी आपले अर्ज हे विहित नमुन्यात व विहित कालावधीतच सर्व आवश्यक त्या कागदपत्रासह ग्रामपंचायत कार्यालय जमा करावेत. |
| ३ | अर्ज हे दिनांक १३/०१/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजे पासून ते दि.२७/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. |
| ४ | विहित कालावधीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. |

ग्रामपंचायत कार्यालय पारगाव सुद्रिक ता.श्रीगोंदा अंतर्गत पाणी पुरवठा कर्मचारी भरती २०२४ अन्वये भरावयाच्या पदांचे नाव रिक्त पद संख्या सामाजिक आरक्षण इत्यादींचा एकत्रित खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | रिक्त पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा कर्मचारी | ०१ | पद आरक्षित नाही |

**पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व कागदपत्रे**

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतन (मानधन) | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | कर्मचारी वर्ग ४ पाणीपुरवठा कर्मचारी | ११९६८/- रु. | १) प्राथमिक शाळा प्रमाणपत्र ७ वी, परीक्षा पास असलेले गुणपत्रक/उच्च शिक्षण असल्यास प्रमाणपत्र जोडावीत. २)आधार कार्ड ३)रेशन कार्ड ४)तिसरे अपत्य नसल्याचे स्वयंघोषणा पत्र ५)शाळा सोडल्याचा दाखला ६)MS-CIT प्रमाणपत्र ७)रहिवाशी स्वयंघोषणा पत्र |

**टीप:** अनुभवी व यापुर्वी ग्रामपंचायतीत काम केलेल्या कर्मचाऱ्यास प्राधान्य राहील. या कर्मचारी भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जहिरात ग्रामपंचायत कार्यालय पारगाव सुद्रिक येथे उपलब्ध आहे व सूचना फलकावर चीकटवलेली असुन उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून अर्ज सादर करावेत. तसेच भरती प्रक्रिया संबंधित प्रक्रियेसाठी आवश्यक व अद्ययावत माहितीसाठी नियमितपणे सूचना फलक पाहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. भरती प्रक्रिया करणे किंवा रद्द करणे, तसेच भरती प्रक्रिया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरण तथा मा.सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय पारगाव सुद्रिक ता.श्रीगोंदा यांना असतील.

**दि.०९/०१/२०२५**
**स्थळ : पारगाव सुद्रिक**

शिक्का

सही/-
**ग्रामविकास अधिकारी**
ग्रामपंचायत पारगांव सुद्रिक
ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर

सही/-
**सरपंच**
ग्रामपंचायत पारगांव सुद्रिक
ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर